
बीड- महाराष्ट्र | बीड, गुरुवार, दि. 17 ऑक्टोबर 2024 | अंक क्र. 156 | वर्षे 2 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

# दैनिक अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ : मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उप संपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

Website: atulyamaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# निवडणुकीपूर्वी दिलेल्या मोफत योजना म्हणजे लाच !



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राजकीय पक्षांनी निवडणुकीवर डोळा ठेवून मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी योजना जाहीर करण्याचा अलीकडचा कल हा लोकशाही मूल्यांच्या अस्तित्वालाच सर्वात मोठा धोका आहे. तसेच तो संविधानाच्या आत्म्यालाही इजा पोहोचवणारा आहे. त्यामुळे सत्ताधारी पक्षांनी निवडणुकीपूर्वी दिलेल्या मोफत गोष्टींचे आश्वासन लाच म्हणून घोषित करावे, अशी मागणी करणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. या याचिकेची दखल घेत न्यायालयाने निवडणूक आयोगासह केंद्र सरकारला नोटीस जारी करत उत्तर मागविले आहे. आयोगाने आज महाराष्ट्र आणि झारखंडच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या आहे. तत्पूर्वी, सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका आधीच्या प्रलंबित प्रकरणांसोबत जोडली आहे.

या याचिकेवर सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या आधी दोन्ही राज्यांतील सत्ताधारी पक्षांनी जनतेसाठी अनेक लोकोपयोगी योजना जाहीर केल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये महिलांसाठी दरमहा १५०० रुपयांपर्यंतची रोख लाडकी बहीण योजना जाहीर करण्यात आली आहे. टोल टॅक्समध्ये सूट देण्यासारखे निर्णयही घेण्यात आले आहेत. अशा निर्णयांना आव्हान देणारी याचिका सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आली आहे. निवडणुकीपूर्वी मोफत योजनांची घोषणा लाच म्हणून जाहीर करावी, अशी मागणी या याचिकेत कोर्टाकडे करण्यात आली. हा एक प्रकारे मतदारांना लाच देण्याचा प्रकार आहे, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. निवडणुकीपूर्वी काही काळ मोफत योजनांच्या घोषणेवर बंदी घालावी, अशी बंदी केवळ सरकारलाच नाही, तर सर्वच राजकीय पक्षांना लागू झाली पाहिजे, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. कर्नाटकातील शशांक जे. श्रीधर यांनी ही नवीन याचिका दाखल केली. २०२२ मध्ये भाजपनेते अश्विनी उपाध्याय याविरोधात जनहित याचिका घेऊन सुप्रीम कोर्टात पोहोचले होते. याचिकाकर्ते शशांक जे. श्रीधर यांचे वकील बालाजी श्रीनिवासन यांनी सोमवारी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या खंडपीठासमोर हे प्रकरण मांडले होते. विधानसभा किंवा सार्वत्रिक निवडणुकांदरम्यान मोफत योजनांचे आश्वासन देणाऱ्या राजकीय पक्षांनी लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ अंतर्गत लाचखोरी किंवा मतांसाठी प्रलोभन मानले पाहिजे. दुसरीकडे, अश्विनी उपाध्याय यांनीही याविरोधात जनहित याचिका घेऊन सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती. मतदारांना मोफत सुविधा किंवा मोफत भेटवस्तू देण्याची आश्वासने थांबवण्याचे आवाहन केले होते. निवडणूक आयोगाने अशा पक्षांची मान्यता रद्द करावी, अशी मागणी याचिकेतून केली.

# मराठा समाजाला आरक्षण देणार आम्ही जे बोलते ते करतो : एकनाथ शिंदे

**मुंबई : वृत्तसंस्था**



मराठा समाजाला आरक्षण देणार आहे. ओबीसीच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठ्यांना आरक्षण देणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महायुतीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितले. मुंबईमध्ये आज महायुतीमध्ये संयुक्त पत्रकार परिषद झाली. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी महायुतीच्या कामाचे रिपोर्ट कार्ड जारी केले. यावेळी पत्रकारांशी बोलताना एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणाबाबत महत्वाचं विधान केले.

अखेर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. महाराष्ट्रात २० नोव्हेंबरला मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होणार आहेत. आचारसंहिता लागू होताच महायुतीने एकत्रितपणे संयुक्त पत्रकार परिषद घेत महाविकास आघाडीसह विरोधकांवर सडकून टीका केली. पत्रकार परिषदेत मराठा आरक्षणासंदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याला स्पष्ट शब्दांत उत्तर देताना मनोज जरांगे यांना एक सल्ला दिला आहे.

मराठवाड्यात कधी कुणबी प्रमाणपत्र मिळत नव्हते. आम्ही न्या. शिंदे कमिटी स्थापन केली. इतकी वर्षे ज्यांच्याकडे संधी होती, हातात सत्ता होती, त्यांनी कधी मराठा समाजाला आरक्षण दिले नाही. फक्त मतांसाठी मराठा समाजाचा वापर केला. मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाला न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरले. पण त्यांनी हा विचार केला पाहिजे की, महायुतीने काय काय दिले, सारथी दिले, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ दिले. ओबीसी समाजाप्रमाणे मराठ्यांना सवलती देण्यात आल्या. हे सगळे कोणी केले? मराठा समाजाला कोणी वंचित ठेवले आणि कोणी दिले, याचा विचार मनोज जरांगे यांनी करायला हवा, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले.

पुढे बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आम्ही जे बोलतो ते करतो. मी स्वत: मराठा समाजाला आरक्षण देणार, तेही ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता. मी दसरा मेळाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वंदन करुन मराठा आरक्षण देण्याची शपथ घेतली. त्यानंतर तात्काळ विधानसभा अधिवेशन बोलवून मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले. देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला आरक्षण दिले होते, ते आरक्षण कोणी घालवले, ते त्यांना कोर्टात टिकवता आले नाही. आता आम्ही आरक्षण दिले आहे, ते रद्द करण्यासाठी आटापिटा सुरु आहे, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना उद्देशून केली.

# परळी विधानसभा मतदारसंघात 3 लाख 35 हजार 954 मतदार ठरविणार परळीचा भावी आमदार कोण

## सर्व राजकीय पक्षांकडून आदर्श आचारसंहितेचे पालन व्हावे : उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर

**परळी /प्रतिनिधी**



महाराष्ट्र सार्वत्रिक विधानसभा निवडणूक 2024 ची केंद्रीय निवडणूक आयोगाने घोषणा केल्यानंतर 233 विधानसभा मतदारसंघातील तयारी बाबत उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांनी आज पत्रकार परिषद घेतली. परळी विधानसभा मतदारसंघातील 3 लाख 35 हजार 954 मतदार परळीचा भावी आमदार कोण हे ठरविणार आहेत. निवडणूक काळात सर्वच राजकीय पक्षांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे असे आवाहन 233 विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांनी केले.

परळी येथे उपविभागीय कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीबाबत पत्रकारांना माहिती दिली. विधानसभा मतदारसंघात एकूण तीन लाख 35 हजार 954 मतदार आहेत .त्यापैकी एक लाख 75 हजार 184 पुरुष तर एक लाख 60 हजार 766 स्त्री मतदार आहेत.

निवडणुकीसाठी एकूण 363 मतदान केंद्रे बनविण्यात आले आहेत .त्यापैकी परळी शहर 88 , परळी तालुका 258 तर अंबाजोगाई तालुक्यातील 105 मतदान केंद्रांचा समावेश आहे. मतदारसंघातील केंद्र क्रमांक 222 वसंत नगर, केंद्र क्रमांक 241 पिंपळा धायगुडा,केंद्र क्रमांक 242 पिंपळा धायगुडा,केंद्र क्रमांक 243 पिंपळा धायगुडा, केंद्र क्रमांक 223 मलकापूर, केंद्र क्रमांक २६३ गुट्टेवाडी, केंद्र क्रमांक 227 नंदनज ,केंद्र क्रमांक 26 पाडोळी, केंद्र क्रमांक 88 भादूरवाडी ,केंद्र क्रमांक 27 औरंगपूर, केंद्र क्रमांक 226 कासारवाडी ,केंद्र क्रमांक 105 सोनहिवरा या 12 केंद्रांचा संवेदनशील मतदान केंद्रे म्हणून समावेश करण्यात आलेला आहे.

233 विधानसभा मतदारसंघासाठी 22 ऑक्टोबर रोजी अधिसूचना प्रकाशित होईल. 29 ऑक्टोबर पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. 30 ऑक्टोबर रोजी छाननी होईल. 4 नोव्हेंबर रोजी उमेदवारांना अर्ज मागे घेता येतील. 20 नोव्हेंबर रोजी मतदान होईल तर 23 नोव्हेंबर रोजी निवडणुकीचा निकाल घोषित करण्यात येईल.

विधानसभा निवडणुकीत उभे राहू इच्छिणाऱ्या सर्वसाधारण उमेदवारांना 10 हजार रुपये अनामत रक्कम तर मागासवर्गीय अनुसूचित जाती आणि जमातीच्या उमेदवारांना 5 हजार रुपये भरावे लागणार आहेत. दरम्यान सर्व उमेदवारांसाठी निवडणूक काळात आवश्यक परवाने काढण्यासाठी तहसील कार्यालयात एक खिडकी योजना सुरू करण्यात येणार असून येथेच सर्व परवाने नियमानुसार उपलब्ध करून देण्यात येतील. या पत्रकार परिषदेला उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार व्यंकटेश मुंडे, दुसरे सहाय्यक निवडणूक अधिकारी मुख्याधिकारी नगरपरिषद कांबळे, तर तिसऱ्या सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून तेजस्वी जाधव काम पाहणार आहेत. यावेळी नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, नायब तहसीलदार परवेज पठाण मॅडम, निवडणूक विभागातील अण्णासाहेब वंजारी साहेब, मिलिंद गायकवाड आदी उपस्थित होते.



# संत चोखामेळा ट्रस्टच्या जागेतील अतिक्रमण हटवण्यासाठी बौद्ध समाज एकवटला

## संत चोखामेळा ट्रस्ट बचाव कृती समितीची होणार स्थापना

**परळी प्रतिनिधी**

शहरातील निजाम काळापासून अस्तित्वात असलेल्या नेहरू चौक नजीक संत चोखामेळा ट्रस्टची जागा आहे. या जागेवर झालेले अतिक्रमण काढण्यासाठी बौद्ध समाजाची व्यापक अशी बैठक आज दिनांक 16 ऑक्टोंबर रोजी जिजामाता उद्यानात संपन्न झाली .या बैठकीत संत चोखामेळा ट्रस्ट बचाव कृती समिती स्थापन करण्याचे एकमताने ठरविण्यात आले. यासाठी लवकरच पुढील दिशा एक बैठक घेऊन ठरविण्यात येणार आहे.याबाबत अधिक माहिती अशी की, शहरातील जगमित्र नागा मंदिर, तसेच सोपान काका मंदिर, आणि संत चोखामेळा मंदिरासाठी निजामाने जमिनी दिल्या होत्या. त्यामुळे संत चोखामेळा ट्रस्ट पुढे स्थापन करण्यात येऊन सदर जमीन ट्रस्टच्या ताब्यात देण्यात आली. परंतु या जमिनीवर पुढे चहुबाजूने अनेकांनी अतिक्रमण केलेले आहे. त्यामुळे चोखामेळा यांचे अनेक कार्यक्रम सध्या बंद पडलेले आहेत. संत चोखामेळा हे वारकरी संप्रदायातील महान असे संत होते. पंढरपूर येथील विठ्ठलाच्या दर्शनापूर्वी प्रत्येक जण संत चोखामेळा यांचे दर्शन घेत असतो. संत चोखामेळा यांनी बौद्ध विचारावर समतेचे पेरणी केलेले आहे. त्यांचे साहित्य हे परिवर्तनवादी आणि तत्कालीन समाज व्यवस्थेविरुद्ध बंड करणारे होते. महाराष्ट्रातील महान संतांच्या यादीमध्ये चोखामेळा यांचा उल्लेख करण्यात येतो. परळी येथील त्यांच्या नावे असलेल्या ट्रस्टच्या जागेवरील अतिक्रमण काढण्यासाठी जिजामाता उद्यान येथे समाजाचे आज व्यापक बैठक संपन्न झाली .या बैठकीत भव्य असे चोखामेळा भवन निर्माण करणे, जागेवरील अतिक्रमण काढणे आदींसह ट्रस्टमध्ये विश्वासतांना सोबत घेऊन आवश्यक ती कार्यवाही करणे असे ठरले. यासाठी लवकरच पुढील बैठक घेण्यात येणार आहे. या बैठकीस समाजातील सर्व ज्येष्ठ नेते, कार्यकर्ते, समाज बांधव , महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोटरगाडीच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**मुंबई वृत्तसंस्था**

अंधेरी, लोखंडवाला परिसरात दुचाकीला मोटरगाडीने दिलेल्या धडकेत २९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. ओशिवरा येथील लोट्स पेट्रोल पंप येथे हा अपघात झाला. उमाशंकर रोहिणी प्रसाद शुक्ला असे मृत व्यक्तीचे नाव आहे. तो डिलेव्हरी एजंट म्हणून काम करायचा. तो मूळचा मध्य प्रदेशचा रहिवासी होता.

मंगळवारी लोटस पेट्रोल पंपाजवळ शुक्लाच्या दुचाकीला मागून एक मोटरगाडीने धडक दिली. त्यामुळे तो खाली पडला आणि त्याचे डोके मोटरगाडीच्या मागच्या चाकाखाली आले. त्यामुळे तो गंभीर जखमी झाला. चालकाने काही अंतरावर मोटरगाडी थांबवली. त्यानंतर तो परत आला व त्याने जखमी शुक्लाला रिक्षात बसवले व कूपर रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. याप्रकरणी मोटरगाडी चालक सौरभ सोलंकी (४२) विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवणार : महादेव जानकर

## महादेव जानकर महायुतीमधून बाहेर

**मुंबई : वृत्तसंस्था**



निवडणुकीच्या तारखांची घोषणा झाल्यानंतर 24 तासांमध्येच महायुतीला पहिला धक्का लागला आहे. महायुतीमधून पहिला मित्रपक्ष बाहेर पडला आहे. राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते आणि माजी कॅबिनेट मंत्री महादेव जानकर महायुतीच्या बाहेर पडले आहेत.

महायुतीमधून बाहेर पडल्यानंतर महादेव जानकर विधानसभा निवडणूक स्वबळावर लढणार आहेत. आज झालेल्या महायुतीच्या पत्रकार परिषदेलाही महादेव जानकर उपस्थित नव्हते. लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीने महादेव जानकरांसाठी एक जागा सोडली होती. परभणीमधून महादेव जानकर निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते, पण त्यांना पराभवाचा धक्का बसला होता. लोकसभा निवडणुकीवेळीही महादेव जानकर महाविकासआघाडीसोबत जायच्या तयारीत होते, यासाठी त्यांची शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत चर्चाही सुरू होती, पण शेवटच्या क्षणी महादेव जानकर यांनी महायुतीसोबत जायचा निर्णय घेतला होता. निवडणुकांची घोषणा होताच सर्वच पक्ष जोमाने कामाला लागले आहेत. लवकरच पक्षांकडून उमेदवारांची घोषणा करण्यात येणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरु झाली आहे.

# दिव्यांग कल्याणकारी संस्थेकडून आत्मविश्वासाचे पंख

## लोकसेवार्थ

**दिव्यांग व विशेष विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 'दिव्यांग कल्याणकारी शिक्षण संस्था व वैद्यकीय संशोधन केंद्र' ६७ वर्षांपासून कार्यरत आहे. दिव्यांगांनी इतरांपेक्षा आपण वेगळे असल्याची भावना विसरायला हवी, त्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांनीही आयुष्य भरभरून जगावे, या दूरदृष्टीने डॉ.रघुनाथ गोविंद काकडे यांनी दि. ६ नोव्हेंबर १९५६ साली 'दिव्यांग कल्याणकारी शिक्षण संस्था व वैद्यकीय संशोधन केंद्रा'ची मुहूर्तमेढ रोवली. सुरुवातीला कोथरुडच्या भालेराव बंगल्यात संस्थेचा प्रारंभ झाला. इवल्याशा रोपट्याचे वटवृक्ष झाले असून त्याच्या सावलीने दिव्यांगांना सकारात्मक जगण्याची दिशा दाखवली. दिव्यांगासाठी पुण्यातील उत्तम कार्य करणारी 'दिव्यांग कल्याणकारी शिक्षण संस्था व संशोधन केंद्र' अशी केंद्राची ओळख आता बनलेली आहे. आजपर्यंत हजारो विद्यार्थी या संस्थेतून माठ्या हुद्द्यावर पोहचले असल्याने संस्थेचे सार्थक झाले आहे. शिक्षण, आरोग्य तर हवेच पण, त्याचबरोबर त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी संस्था नेहमीच प्रोत्साहन देते असते**

पुण्यातील वानवडी येथे १९५९ पासून सुरु असलेल्या संस्थेत काम सुरु तर आहेच, ते उत्तरोत्तर वाढत गेले. यंदा संस्थेतील दहावीतील विद्यार्थ्यांचा निकाल ९३ टक्के लागला असून, अनेक तरुणांनी चांगले गुण मिळवले आहेत. तर, विविध क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी प्रावीण्यही मिळवले आहे. संस्थेच्या सुरूवातीला संस्थेत केवळ सहा मुले होती. ही संख्या कालांतराने वाढत गेली अन् वसतिगृह झाले. २००० साली येथे मुलांसाठी शाळा बांधण्यात आली. मुला-मुलींचे वसतिगृह, सांस्कृतिक सभागृह, सुसज्ज ग्रंथालय, मैदान अशा विविध सुविधा विद्यार्थ्यांसांठी उपलब्ध आहेत. शिक्षणाबरोबरच त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच, त्यांच्यातील सुप्त गुण ओळखण्यासाठी इथे वेगळे वर्गही चालवले जातात. एवढेच नव्हे, स्पर्धाही घेतल्या जातात. उत्कृष्ट सादरीकरणासाठी प्रोत्साहन म्हणून बक्षिस देऊन सन्मानही केला जातो. एवढ्यावरच न थांबता पुढे जिल्हास्तरीय व राष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी त्या खेळाडुंना संस्था सहकार्य करते.दिव्यांगांनी स्वत:च्या पायावर उभे राहावे. विशेष विद्यार्थ्यांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून ताठ मानाने वावरतात यावे, यासाठी केंद्रातून दहा अधिक वेगवेगळ्या प्रकाराचे प्रशिक्षण दिले जाते. त्यात प्रामुख्याने ई-लर्निंग, सुतारकाम, इलेक्ट्रिशियन, शिवणकला, मोबाईल रिपेअरिंग, संगीत वर्ग, संगणक प्रशिक्षण, हस्तकला अशा विविध कोर्सेसचा समावेश आहे. संस्थेच्या या बहुमोल कार्यासाठी दिव्यांग व्यक्तीच्या सशक्तीकरणाबरोबरच संस्थेला राष्ट्रपतींच्या हस्ते दिला जाणारा राष्ट्रीय पुरस्कार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार असे दोन नामांकित पुरस्कार मिळाले आहेत. दिव्यांग कल्याणकारी संस्था आणि सक्षम (समदृष्टि, क्षमताविकास एवं अनुसन्धान मंडळ) या माध्यमातून दिव्यांग कल्याणकारी संस्थेत दिव्यांग विद्यापीठ उभारण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. त्याला सक्षमची मान्यता आहे. हा प्रस्ताव विचारधीन असून, राज्य शासनाकडे प्रस्ताव देण्यात आला आहे.





## अक्षरधारा

# लोकसंस्कृतीच्या गाढ्या अभ्यासक तारा भवाळकर

लेखिका डॉ. तारा भवाळकर यांची अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. ६ ऑक्टोबर रोजी पुण्यात महाराष्ट्र साहित्य परिषदेची बैठक पार पडली. या बैठकीत तारा भवाळकर यांचं नाव निश्चित करण्यात आलं. दिल्ली या ठिकाणी पार पडणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे. तारा भवाळकर कोण आहेत याची माहिती आपण जाणून घेऊ.तारा भवाळकर या लोकसाहित्याच्या अभ्यासक आहेत. १९७० ते १९९० या कालावधीत तारा भवाळकर या श्रीमती चंपाबेन वालचंद शाह या सांगलीतील महाविद्यालयात डॉ. तारा भवाळकर प्राध्यापिका म्हणून कार्यरत होत्या. लोकसाहित्य, लोकसंस्कृती यांच्या अभ्यासासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य खर्ची घातलं आहे. लोकसंस्कृतीचा अभ्यास, स्त्री मुक्ती चळवळ, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ हे देखील डॉ. तारा भवाळकर यांच्या आवडीचे विषय आहेत.

स्त्रीवादी दृष्टीकोनातून संशोधन करुन लिहिणाऱ्या महत्वाच्या लेखिका म्हणूनही डॉ. तारा भवाळकर यांची ओळख आहे. अलिकडेच त्यांनी सीतायन हे पुस्तक लिहिलं आहे. या पुस्तकात त्यांनी सीतेच्या वेदना आणि विद्रोह यांचं चित्रण केलं आहे. सांगलीत प्रायोगिक नाट्यसंस्था सुरु करण्यातही तारा भवाळकर यांचा सहभाग होता.डॉ. तारा भवाळकर यांनी चाळीसहून अधिक पुस्तकं लिहिली आहेत. 'तिसऱ्या बिंदूच्या शोधात', 'महामाया', 'आकलन आणि आस्वाद', 'लोकपरंपरेतील सीता', 'माझिये जातीच्या', 'लोकनागर रंगभूमी', 'मातीची रुपे' ही त्यांची पुस्तकं चर्चेत राहिलेली आहेत.डॉ. तारा भवाळकर यांचा जन्म १ एप्रिल १९३९ मध्ये झाला. प्रामुख्याने वैचारिक लेखन करणाऱ्या एक मराठी लेखिका आहेत. प्राध्यापक म्हणून त्यांनी अनेक वर्ष काम केलं आहे. निवृत्त झाल्यावर पुण्यातील ललित कला अकॅडमी आणि मुंबई विद्यापीठ लोककला अकॅडमीमध्ये अतिथी प्राध्यापक देखील होत्या.त्यांच्या या साहित्य संपदेचा आणि लोकसंस्कृती अभ्यासाच्या योगदानाचा अनेक पुरस्कारांनी सन्मान केला गेलेला आहे.

यामध्ये,पुणे विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट प्रबंधासाठी पुरस्कार, महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार,अखिल भारतीय दलित साहित्य अकादमी दिल्लीः डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरववृत्ती, वि.म. गोखले पुरस्कार,वाङ्मय समीक्षा प्रथम पुरस्कार वाडमय चर्चा मंडळ,महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे जीवनगौरव पुरस्कार, विशेष सन्मानवृत्ती महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, रत्नशारदा पुरस्कार सह्याद्री वाहिनी दूरदर्शन,या पुरस्कारांनी डॉ. तारा भवाळकर यांचा गौरव करण्यात आला आहे. मराठी साहित्यविश्वात मोलाचं योगदान देणाऱ्या डॉ. तारा भवाळकर या आता दिल्लीत होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनात काय भूमिका मांडणार हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

## शब्दार्थ

CEO चे संक्षिप्त रूप Chief Executive Officer म्हणजेच मुख्य कार्यकारी अधिकारी होय. सीईओ हे पद कंपनी किंवा संस्थेतील उच्च स्थान दर्शवते आणि सीईओ व्यवस्थापन आणि प्रशासनाचा मुख्य प्रभारी म्हणून कार्य करत असतो. सीईओ हा सर्वांत वरिष्ठ प्रशासकीय किंवा कार्यकारी अधिकारी आहे जो कंपनी संपूर्ण कामकाज चालवण्या करिता तसेच व्यवस्थापन करण्यास सक्षम असतो आणि तो कंपनीच्या फायद्याच्या संबंधित निर्णय घेत असतो. तसेच कंपनीचे सीईओ अध्यक्ष किंवा संचालक मंडळाला थेट अहवाल देतात.

**संकलन –संयोजन**
**सुबोध रणशेवरे इमेल –subodh.ranshevre @rediffmail.com**

## लोकसेवार्थ

# कुडमुड्यांचा काळ!

समाजमाध्यमांतून स्वातंत्र्याचा सर्रास विनयभंग होताना दिसतो, तो सभ्यतेच्या सर्व मर्यादा पाळून स्वातंत्र्य उपभोगायचे असते आणि ते तसे उपभोगता येते हे माहीत नसल्यामुळे. वाहतुकीची शिस्त आणि तिचे महत्त्व कळण्याआधी वाहने हाती आल्याने वा दूरसंचार यंत्रणा वापरण्याची सभ्यता बिंबवली जायच्या आधी थेट मोबाइल फोन मिळाल्याने जे होते, तेच समाज म्हणून विकसित होण्याआधीच समाजमाध्यमे फोफावल्याने घडत आहे. या बिनडोकी समाजमाध्यमांची झळ डोळय़ावर पट्टी बांधलेल्या न्यायदेवतेलाही आता थेट बसू लागल्याने सरन्यायाधीश एन. व्ही. रमण यांनी याची दखल घेतली ते बरे झाले. शालेय काळात कृतक शिस्तीच्या वातावरणात करकचून बांधले गेलेले विद्यार्थी महाविद्यालयात शिरल्या शिरल्या कानात वारे गेल्यासारखे वागू लागतात. समाजमाध्यमांमुळे आपल्या समाजाचे वर्तन हे असे झाले आहे. याचा दोष काही संस्कृतीमरतड स्वातंत्र्यास देतील. अशांची संख्या आपल्या समाजात खूप. लोकशाहीची सर्व सुखे दोन्ही हातांनी ओरपत असूनही हा वर्ग 'आपल्याला हुकूमशहाच हवा' असा अत्यंत मूर्ख युक्तिवाद करत असतो. पण दोष त्यांचा नाही. सभ्यतेच्या सर्व मर्यादा पाळून स्वातंत्र्य कसे उपभोगायचे असते हे; आणि ते तसे भोगता येते हेही माहीत नसले की असेच होणार. समाजमाध्यमांतून आपल्याकडे स्वातंत्र्याचा सर्रास विनयभंग होताना दिसतो तो यामुळे. त्याची मजल न्यायदेवतेच्या अंगरख्यास हात लावण्यापर्यंत गेली यात अजिबात आश्चर्य नाही. बोलणे आणि बरळणे, पिणे आणि ढोसणे, अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि अद्वातद्वा बडबड यांतील फरक कळण्यासाठी बौद्धिक ठहराव असावा लागतो. तो नसल्याने आणि आपल्या अंगी त्याचा विकास व्हावा अशी इच्छादेखील नसल्याने अशा माध्यमे-समाजमाध्यमांवर कोरडे ओढण्याची वेळ सरन्यायाधीशांवर आली. यानिमित्ताने माध्यमे आणि समाजमाध्यमे यांच्या वास्तवाचा आढावा घ्यायला हवा.

याचे कारण असे की सरन्यायाधीशांनी आपल्या प्रतिपादनात मुद्रितमाध्यमे आणि समाजमाध्यमे यांची तुलना केली आणि मुद्रितमाध्यमे विश्वासार्हता राखून आहेत याबाबत समाधान व्यक्त केले. एक जबाबदार मुद्रितमाध्यमकर्मी म्हणून 'लोकसत्ता'तर्फे सरन्यायाधीशांच्या वक्तव्याचे स्वागत. ते करताना एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा. सध्याचे उच्छादी समाजमाध्यमी आणि शंभर वा त्याहूनही अधिक वर्षांपूर्वीचे मुद्रितमाध्यमी वावदूक यांच्यातील वैचारिक साम्य. हे दोघेही विचारधारेच्या एकाच बाजूला आढळतात हा योगायोग खचितच नसावा. म्हणजे ज्या वेळी पुण्यासारख्या सनातनी शहरात गोपाळ गणेश आगरकर वैचारिक सुधारणेची चूड पेटवत होते, बाळ गंगाधर टिळकांचा 'केसरी' गर्जत होता, शिवरामपंत परांजपे यांचा 'काळ' व्यवस्थेवर कोरडे ओढत होता त्याच वेळी भास्कर बळवंत, लक्ष्मण बळवंत आणि दिनकर बळवंत हे भोपटकर बंधू 'भाला'सारख्या नियतकालिकातून या समाजसुधारणेची अत्यंत वाह्यात शब्दांत टर उडवत होते. स्त्री-पुरुष समानता, कुटुंबनियोजन आदी विषयांवर 'भाला'त तोडण्यात आलेले तारे आजही अनेकांच्या डोळय़ांसमोर अंधारी आणतील. त्यातील आणि आजच्या समाजमाध्यमांतील भाषा, वैचारिक उंची यांत गुणात्मक फरक शून्य. आज जसे समाजमाध्यमांत कोणत्याही वावदूक गप्पा सत्य म्हणून पचवणारे आहेत तसेच अगदी अलीकडेपर्यंत 'अश्वत्थामा परत आला' अशा मुखपृष्ठकथा रवंथ करणारे अनेक होते. असे पुष्कळ दाखले देता येतील. तथापि काळाच्या ओघात या वावदुकांची संख्या कमी होत गेली आणि वर्तमानपत्र हाताळणारे काही एक बौद्धिकता राखत राहिल्याने वृत्तपत्रविद्या प्रगल्भ होत गेली. या इतिहासाचा अर्थ असा नव्हे की आजचे बालिश आणि निर्बुद्ध हे उद्या आपोआप पोक्त आणि बुद्धिवान होतात. त्यासाठी बुद्धीची मशागत करावी लागते आणि त्यासाठी अशा बौद्धिकतेची गरज वाटून घेणारा समाज विकसित व्हावा लागतो. खरी बोंब आहे ती ही.

ती आपल्याकडे अधिक उठून दिसते. खरे तर अमेरिकेसारख्या प्रगत म्हणवल्या जाणाऱ्या देशात डोनाल्ड ट्रम्प यांनी गतसाली जे घडवून आणले ते अशाच बिनडोक समाजमाध्यमींच्या जोरावर. रेड इंडियन्सच्या वेशात, भाले, काठय़ा घेऊन अमेरिकी प्रतिनिधीगृहावर चालून येणाऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी पाहून कोणाचीही झोप उडावी. तथापि तो देश आणि आपण यांतील फरक हा की बेभान बैलासारखे वर्तन करणाऱ्या ट्रम्प यांना रोखणारी माध्यमे त्या देशात मोठय़ा संख्येने आहेत आणि आपल्या देशात त्यांची संख्या एकाच हाताच्या बोटावर मोजता येईल इतकीच आहे. त्यामुळे अमेरिकेपेक्षा आपल्याकडे समाजमाध्यमांतील उच्छाद हा अधिक गंभीर आणि धोकादायक ठरतो. अशा वेळी माध्यमांची विश्वासार्हता आणि अन्य माध्यमे तसेच समाजमाध्यमांची अविश्वास पसरवण्याची क्षमता यांच्यात संघर्ष होऊ लागतो आणि त्यात अविश्वासकर्त्यांचे पारडे जड होऊ लागले की सरन्यायाधीशांसारख्यास त्याची दखल घ्यावी लागते. अगदी काही दिवसांपूर्वीच सर्वोच्च न्यायालयातील जे. बी. पारडीवाला या अन्य न्यायाधीशांनीही समाजमाध्यमांविषयी संताप व्यक्त केला होता. ''समाजमाध्यमात जे प्रसृत होते त्यात विधायक समीक्षेचा अभाव असतो आणि न्यायाधीशांविषयी व्यक्तिगत मतमतांतरेच अधिक असतात. त्यामुळे न्यायसंस्थेला इजा पोहोचते,'' असे पारडीवाला यांना वाटले तर, ''या अज्ञानमूलक माध्यमे-समाजमाध्यमांमुळे लोकशाही दोन पावले उलट मागेच जाते,'' असे सरन्यायाधीश म्हणतात. या दोन्ही विधानांच्या मुळाशी आहे एक सत्य. ते म्हणजे बहुसंख्याकवाद. लोकशाहीची आपल्याकडील समज ही गुणांपेक्षा संख्येशी अधिक निगडित आहे. 'पाचामुखी परमेश्वर' यासारख्या वाक्प्रचारातूनही हेच सत्य अधोरेखित होते. एकाच्या विरोधात केवळ पाच जण आहेत म्हणून त्यांचे बरोबर असे नसते. संख्येने अधिक हा निर्णयाचा निकष मतपेटीपुरताच ठीक. प्रत्येक निर्णयाचा आधार संख्या हाच असू लागला तर त्यातून केवळ झुंडशाहीच जन्मास येते. तिचाच आविष्कार सध्या समाजमाध्यमांत पाहावयास मिळतो. आपल्या समाजात ही धारणा कायमच होती. तथापि समाजमाध्यमांच्या आगमनामुळे तिचा आविष्कार हा असा अलीकडे डोळय़ावर येतो. त्यामुळे अनेकजण अचंबित होत असले तरी आपला सामाजिक इतिहास हा बहुमताच्या अरेरावीचा आहे. प्रचलित समज, श्रद्धा यांच्याविरोधात अत्यंत परखड बौद्धिक आणि तर्कवादी भूमिका मांडणाऱ्या गोपाळ गणेश आगरकर यांची त्यांच्या हयातीतच अंत्ययात्रा काढण्याचे पुण्य या समाजाच्या नावावर आहे. आगरकरांचे पाप इतकेच की त्यांनी बहुमतास विरोध दर्शवला.











# युतीचे 2019 बिनसले :

भाजप आणि शिवसेना युतीने २०१९ मध्ये विधानसभा लढवली. भाजपला १०५ जागांवर, तर शिवसेनेला ५८ जागांवर यश मिळाले, त्यात मुख्यमंत्रिपदावरून युतीचे बिनसले आणि शिवसेना युतीतून बाहेर पडली.

**नवी आघाडी तयार झाली**

शिवसेनेने महायुतीतून बाहेर पडल्यानंतर नवी समीकरणे निर्माण झाली. भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस अशा तीन पक्षांनी एकत्र येत शरद पवारांच्या नेतृत्वात महाविकास आघाडी निर्माण करीत सत्तास्थापनेचा प्रयत्न केला.

**पहाटेचा शपथविधी :**

यादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी काही आमदारांना सोबत घेऊन देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सत्तास्थापनेचा दावा केला.

राजभवनात फडणवीसांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, तर अजित पवारांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. २३ नोव्हेंबर २०१९ चा हा पहाटेचा शपथविधी तेव्हा राज्यात खळबळ उडवून देणारा ठरला.

**अजित पवार पुन्हा स्वगृही परतले :**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत केलेला सत्तेचा प्रयोग हा ८० तासांत फसला. अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अर्थातच स्वगृही परतले होते. मात्र, देवेंद्र फडणवीस यांनी काही तासांमध्ये राजीनामा दिल्याने सर्वात कमी कालावधीसाठी राज्याचा मुख्यमंत्री विक्रम त्यांच्या होण्याचा नावावर नोंदवला गेला.

**उद्धव ठाकरे झाले मुख्यमंत्री :**

अजित पवार स्वगृही परतल्यानंतर महाविकास आघाडीने सत्तास्थापनेचा दावा केला. महाविकास आघाडीच्या बैठकीत सर्वानुमते मुख्यमंत्रिपदासाठी उद्धव ठाकरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. २८ नोव्हेंबर २०१९ रोजी महाराष्ट्र राज्याचे १९ वे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरे यांनी शपथ घेतली.

**शिवसेना फुटली बंडखोरी घडली ;**

शिंदेंचे बंड महाविकास आघाडीचे सरकार अडीच वर्षांतच कोसळले आणि त्याला कारणीभूत ठरले ते एकनाथ शिंदे यांचे बंड. २०२२ मध्ये जून महिन्यात महाराष्ट्रातील विधान परिषदेच्या निवडणुका पार पडताच एकनाथ शिंदे काही शिवसेना आमदारांना घेऊन सुरतमार्गे ते गुवाहाटीला पोहोचले. एकनाथ शिंदे यांना ४० आमदारांचा पाठिंबा मिळाला. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिला आणि महाविकास आघाडी सरकार पडले.

**मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदेंच्या नावाची घोषणा :**

शिंदे आमदारांसह मुंबईत परतल्यानंतर भाजपने मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदेंच्या नावाची घोषणा केली. दिनांक ३० जून २०२२ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शिंदे यांनी शपथ घेतली. पुढे निवडणूक आयोगासमोरील याचिकेमध्ये आयोगाने शिंदे गटाला खरी शिवसेना म्हणून मान्यता दिली. राष्ट्रवादीचा नवा गट; अजित पवार उपमुख्यमंत्रिपदी : अजित पवार यांनी २ जुलै २०२३ रोजी शिवसेना-भाजप सरकारमध्ये सामील होत पुन्हा एकदा उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. अजित पवार यांच्यासोबत छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे-पाटील, धनंजय मुंडे यांनीही कॅबिनेटमंत्रिपदाची शपथ घेतली.












# शहरातील लॉज खपवतात अल्पवयीन प्रेमीयुगलांचे जाळे

**साकोली : साहिल रामटेके**

साकोली शहरात लाज मध्ये हितसंबंध जोपासून चक्क अल्पवयीनांना प्रवेश दिला जात असल्याची खळबळ जनक माहिती पुढे आली आहे. येथे अल्पवयीन प्रेमीयुगलांचे जाळे खपवले जात असून, पोलीस प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

राज्यात घडलेल्या महिला विरोधी घटना समाजमन सुन्न करणाऱ्या असल्या तरी शहरात आडमार्गाने प्रवेश करणाऱ्या शाळकरी मुला-मुलींचे लॉजवरील प्रवेश अनेक गंभीर परिस्थितीकडे बोट दाखवत आहेत. शाळा-महाविद्यालयाच्या वेळेवर तोंडाला मुस्के बांधून प्रेमी युगलांचे आजच्या दिशेने होणारी धाव स्थानिक नित्य-नेमाने अनुभवत आहे. त्याची डबकी कुजबूज मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या प्रत्येक तोंडून ऐकू येत आहे. मात्र यावर एखाद्या संवेदनशील अनुचित प्रकाराने वाचा फुटेल की काय??अशी काहीशी परिस्थिती शहरात अनुभवास येत आहे.

**ओळखपत्र तपासण्याचे तंत्र मागासलेले**

आधार कार्ड वरील क्यूआर अथवा बारकोड स्कॅन करून त्यातील गुप्त माहिती पुढे आणणारे मोफत ॲप्स अँड्रॉइड मोबाईलवर सहज उपलब्ध आहेत. मात्र,त्याचा वापर लाज मालक करतात काय? सहसा सोबतीला असलेला पुरुष हा वयस्कर असतो. त्यावेळी मुलीच्या वयाची पतताडणी नेमकी कशी केली जाते ? यामुळे जिल्हा प्रशासनाकडे लाजमालकांना आधुनिक तंत्राशी अवगत करून देण्याचे व कायदा सुव्यवस्था जपण्याचे मोठे आवाहन उभे ठाकले आहे.

**चक्क शालेय गणेशात प्रवेश**


साकोली हे शैक्षणिक केंद्र आहे. तालुक्यासह इतर ठिकाणाहून येथे हजारोंच्या संख्येने विद्यार्थी दाखल होतात. शहरात शाळा विद्यालय तथा महाविद्यालयांचे दाट जाळे पसरले आहेत. त्यामुळे एखाद्याच्या प्रलोभनातून भटकलेली निरागस मुलगी चक्क शालेय गणवेश यातच लॉजवर प्रवेश करताना अनेकांनी पाहिले आहे.

**आधार कार्ड वर कृत्रिम खोडतोड**

लॉजवर येणाऱ्यांना ओळखपत्राची अनिवार्य मागणी केली जाते. अल्पवयीन कडून त्याजबाबतीत दिशाभूल केली जात असल्याची माहिती "दैनिक अतुल्य महाराष्ट्र"च्या स्टिंग ऑपरेशन मधून पुढे आली आहे. डिजिटल आधार कार्ड वर वास्तविक नाव, जन्मतारीख आणि पत्त्याऐवजी खोटी माहिती समाविष्ट करून खोट्या आयडीच्या आधारावर प्रेमी युगल लॉज मध्ये प्रवेश मिळवीत आहेत.

**पोलिसांकडून शून्य कारवाई**

शहरामध्ये हीच सबंध जोपासून अल्पवयीन मुला-मुलींना लॉजमध्ये प्रवेश दिला जात आहे. तरी मात्र आजपर्यंत लॉजवरील अल्पवयीनांच्या अश्लील चाळ्यांची साधी दखल पोलीस खात्याने घेतली नाही.



# धानोरा महाविद्यालयाचा प्रथमेश माने कुस्ती स्पर्धेत राज्यात प्रथम

**आष्टी प्रतिनिधी**




तालुक्यातील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय धानोरा येथे इयत्ता बारावीमध्ये शिक्षण घेत असलेला प्रथमेश हनुमंत माने या विद्यार्थ्याने अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयात राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये प्रथमेश माने याने 86 किलो वजन गटात कुस्ती प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. याविषयी अधिक माहिती अशी की धानोरा येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धानोरा येथे इयत्ता बारावी मध्ये शिक्षण घेत असलेला प्रथमेश माने याने आतापर्यंत तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय, विभागस्तरीय कुस्तीमध्ये अनेक पारितोषिके मिळवलेले आहेत. सोमवार दिनांक 15 ऑक्टोबर रोजी अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयामध्ये राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा घेण्यात आल्या. या कुस्ती स्पर्धेमध्ये प्रथमेश माने या खेळाडूने पुणे, जळगाव व कोल्हापूर येथील मल्लांना एका क्षणात आसमान दाखवत प्रथम क्रमांक पटकावला. यानंतर दिनांक 18 ऑक्टोबर रोजी यवतमाळ येथे राज्याचा संघ निवडण्यात येणार आहे. प्रथमेश माने हा 22 ऑक्टोबर रोजी दिल्ली येथे राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेमध्ये खेळणार आहे. प्रथमेश माने हा वारजे पुणे येथे कुस्तीचे धडे घेत आहे. प्रथमेश चे वडील हनुमंत माने हे राष्ट्रीय कबड्डी चे खेळाडू आहेत. त्यांचे मार्गदर्शन प्रथमेश ला मिळत आहे.मिळवलेल्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार भीमरावजी धोंडे साहेब, प्रशासन अधिकारी डॉ. डी बी राऊत, प्रा. शिवदास विधाते, माऊली बोडखे, संजय शेंडे, प्राचार्य डॉ भगवानराव वाघुले, डॉ कैलास वायभासे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ सुभाष नागरगोजे, स्टाफ सेक्रेटरी प्रा निसार शेख, प्रा आजिनाथ गिलचे, प्रा ज्ञानदेव बोडखे, प्रा विवेक महाजन, प्रा गहिनीनाथ एकशिंगे, प्रा सुभाष मोरे, प्रा राजू शेलार, प्रा राजेंद्र मिसाळ, प्रा आतेश बनसोडे, प्रा सतीश तागड, प्रा डॉ संजय झांजे, डॉ उस्मानखान पठाण आदींनी अभिनंदन करून दिल्ली येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मातोश्री विद्यालय महागावच्या दोन संघाची राज्यस्तरीय सामने खेळण्यासाठी धाव



**महागाव : प्रतिनिधी**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन द्वारा आयोजित शालेय थ्रो बॉल स्पर्धेत 14 व 19 वयोगटातील दोन संघ विभागीय सामन्यात खेळून अतिशय चुरशीचा विजय मिळविला व राज्यस्तरावर खेळण्याची संधी प्राप्त केली. 14 वर्ष संघाचे नेतृत्व साहिल खोषे, शिवकृष्ण गावंडे, रोहित वानखेडे, रुद्रवीर राऊत, पवन राऊत, सोहम पतके, योगेश चव्हाण, कृष्णा वळसे, गौरव अखाडकर, समर्थ शिंदे, रुद्र हिरेकर, अंशतोश पवार ह्या वयोगटाच्या संघाने आपले वर्चस्व स्थापन करून राज्यस्तरीय खेळाची संधी प्राप्त केली. 19 वर्षे वयोगटातील कर्णधार म्हणून भार्गव रानडे ह्याने अतिशय चुरशीत संघ तयार करून विजय मिळवला. संघामध्ये खेळाडू धनंजय दारव्हेकर, ओंकार नेवारे, प्रणव भिमटे, कृष्णा लांडगे, हरीश जाधव, वृषभ खरतडे, वेदांत हिंगाडे, अमन शेख, अनिरुद्ध पाईकराव, श्री खोषे, दुर्गेश घोडे, हे खेळाडू अतिशय जिद्दीने खेळून विभागात क्रमांक मिळून राज्यस्तरावर खेळण्याची संधी प्राप्त केली. खेळाडूंचे सर्वत्र कौतुक होत असून संस्थेचे संस्थापक दिगंबर जगताप ह्यांनी खेळाडूंचे कौतुक करून पुढील खेळास शुभेच्छा दिल्या, प्राचार्य व समस्त कर्मचारी यांनी खेळाडूंना राज्यस्तरीय सामने विजयश्री व्होवो ह्या सदिच्छा दिल्या.

# विधानसभा निवडणुकीसाठी खर्चाची मर्यादा 40 लाख : वैशाली पाटील

**आष्टी(प्रतिनिधी)**

विधानसभा -मतदारसंघासाठी मंगळवारपासून - आचारसंहिता लागू झाली आहे.या विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांच्या -खर्चाची मर्यादा ४० लाख रुपये इतकी राहणार आहे.दरम्यान विधानसभेसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी १० हजार रुपये इतकी अनामत रक्कम राहणार आहे. अशी माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार वैशाली पाटील यांनी दिली आहे. आष्टी विधानसभा मतदार संघाची निवडणुकीच्या अनुषंगाने आष्टी तहसिल कार्यालयात बुधवार (दि.१६) रोजी दुपारी ५ वा.आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत पाटील बोलत होते.पुढे बोलतांना सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पाटील म्हणाल्या,आष्टी मतदारसंघात पुरूष मतदार २ लाख ३ हजार ८३८,स्त्री मतदार १ लाख ९ हजार १९१ असे एकूण ३ लाख ८३ हजार ३० मतदार असून,एकूण ४४० मतदान केंद्र यामध्ये ३७ मतदान केंद्र हे संवेदनशील असल्याची माहिती पाटील यांनी दिली.




# चौसाळा महाविध्यालयात ग्रीन क्लब कार्यशाळा संपन्न



**चौसाळा** : कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे दि. १५/१०/२०२४ रोजी ग्रीन क्लब अंतर्गत कार्यशाळा संपन्न झाली . युथ एंगेजमेंट ऑफ वाटर स्टेवर्डशिफ या उपक्रमा अंतर्गत उच्च व तंत्रशिक्षण विभाग व युनिशेफ यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली , नैसर्गिक संसाधानाचे संरक्षण, पाण्याची बचत, प्लास्टिक मुक्त महाविद्यालय, उर्जेची बचत, वृक्षसंवर्धन या बाबत विध्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण होण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ . राहुल देशमुख यांनी जलसंधारणाचे महत्व विशद केले. विद्यार्थ्यांनी सजीवांसाठी शाश्वत भविष्य सुनिश्चित करण्यासाठी अर्थपूर्ण पर्यावरणीय उपक्रमामध्ये सहभागी व्हावे असे त्यांनी आवाहन केले,अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ.विलास भिल्लारे म्हणाले की, विध्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय व्यवस्थापनाची मुल्ये रुजविण्यासाठी ग्रीन क्लब महत्वाची भूमिका बजावत आहे. व्यासपीठावर उपप्राचार्य चांगदेव शेळके ,पदयुत्तर संचालक डॉ.सुधाकर वणवे,कमविचे उपप्राचार्य गणपती ढवळशंख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व प्रास्ताविक समन्वयक प्रा.डॉ.सुर्यकांत देशमुख यांनी केले. तर आभार प्रा.डॉ. पंढरीनाथ हिरवे यांनी व्यक्त केले . या कार्यक्रमासाठी प्रा.डॉ.प्रशांत साबळे, प्रा.डॉ.सुदर्शन अवस्थी, प्रा.सुधीर माने,प्रा.डॉ. महादेव मुंडे, प्रा.डॉ.परमेश्वर वाणी, प्रा.ओम चाळक यांच्यासह विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# महर्षी वाल्मिक ऋषी यांच्या जयंती उत्सवास वाल्हे ता. पुरंदर जि. पुणे येथे सर्वांनी उपस्थित रहावे : बळीराजे वाघमारे

**अंबाजोगाई प्रतिनिधी**



रामायण रचयिता, आद्यकवी महर्षी वाल्मिक ऋषी यांची जयंती दिनांक - 17/10/2024 वार. गुरुवार रोजी सकाळी 09 ते 07 या वेळेत मौजे. वाल्हे ता. पुरंदर जि. पुणे येथे मोठय़ा उत्साहात कोळी राष्ट्रसंघ च्या वतीने जयंती साजरी करण्यात येणार आहे. सकाळी 8 ते 10 हडपसर, उरुळी कांचन मार्गे जेजुरी, वाल्हे मोटारसायकलवरून रॅली काढण्यात येणार आहे. 10 ते 12 किर्तन, दुपारी 12 वा. संजीवनी समाधी वर पुष्प वर्षाव करुन विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे 1ते 5 पर्यंत महाप्रसाद तरी कोळी समाज बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे. मराठवाडा सह विविध विभाग, जिल्ह्यातुन येणाऱ्या सर्व समाजबांधवांनी सावकाश यावे असे आवाहन कोळी राष्ट्रसंघ चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष बळीराजे वाघमारे यांनी केले आहे.



**परळी** विधानसभा मतदारसंघ हा राज्याला ओळख असलेला मतदारसंघ आहे. वैद्यनाथ प्रभूंच्या पावन वास्तव्याने पुनीत झालेली भूमी, मराठवाड्यातील सर्वात जुने रेल्वे स्थानक असल्याने दळण वळणाच्या बाबतीत जोडल्या गेलेले शहर. येथील अर्थव्यवस्था ही बहुतांश कृषी केंद्रित अर्थव्यवस्था आहे. जसा हा भाग ऊसतोड मजुरांचा भाग म्हणून ओळखला जातो तसाच हा भाग विविध अंगांनी ओळखला जातो. राजकीय दृष्ट्या राज्याला परिचित असलेला हा मतदार संघ आणि तालुका आहे. पूर्वीचा रेणापूर असलेला हा मतदारसंघ १९९२ ला परळी मतदार संघात रूपांतरित झाला. या मतदार संघाचं वैशिष्ट्य म्हणजे हा कायम पुरोगामी विचारांच्या पाठीशी राहिलेला मतदार संघ आहे. अण्णाभाऊ गित्ते, रघुनाथराव मुंडे, पंडितराव दौंड, स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्यासारखे मोठे नेतृत्व या भागाने राज्याला दिलेले आहेत. सोयाबीन, ऊस, कापूस उत्पादक शेतकऱ्यांची संख्या इथे मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येईल. राजकीय दृष्ट्या फार संवेदनशील असलेला हा भाग आहे. राज्यातील बड्या नेतृत्वापैकी शरद पवारांच्या आणि गोपीनाथराव मुंडे यांच्याच विचारांच्या पाठीशी उभा असलेला हा भाग आहे. अलीकडच्या काळात राजकीय अदलाबदलीत जुनेच परंतु नव्याने राजकीय पटलावर उदयास आलेले व्यक्तिमत्व म्हणजे राजाभाऊ फड... त्यांनी नुकताच शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने परळी मतदारसंघात हे नाव विशेष अर्थाने आता पुढे आले आहे. महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर जरी हे नाव नव्याने आले असेल तरीही त्यांचा राजकीय अनुभव मोठा आहे, सामाजिक कार्याचे व्यासंगी व्यक्तित्व असल्याने मोठा लोकसंपर्क आहे, कारखानदार आणि व्यावसायिक असल्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नाची जाणीव आहे, उच्च शिक्षित असल्याने महिला, मुली आणि विद्यार्थ्यांच्या नेमक्या प्रश्नांची जाण आहे. त्यांच्या व्यक्तित्वच्या जुन्याच परिचयाचा हा नव्याने धांडोळा...



# राजेभाऊ फड

Rajebhau Phad

## बहुआयामी उच्चशिक्षित व्यक्तिमत्व...



०३ जून १९८० रोजी राजाभाऊ फड यांचा कन्हेरवाडी येथे जन्म झाला. इथेच प्राथमिक शिक्षण झाले आणि परळी वैजनाथ येथे पुढील शिक्षण त्यांनी घेतले. पदवीचे शिक्षण पूर्ण करून बिपिएड पूर्ण केले. महाविद्यालयीन जीवनातच चळवळीचा कार्यकर्ता म्हणून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली. आज जरी राजकीय क्षेत्रात त्यांची नव्याने ओळख महाराष्ट्राला झाली असली तरी ते मागील अनेक वर्षांपासून या क्षेत्रात कार्यरत आहेत. राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांच्या पक्षाचे युवक प्रदेश उपाध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केले. त्यांचे सासरे आ.रत्नाकर गुट्टे यांना २०१९ विधानसभा निवडणुकीत निवडून आणण्यात "किंगमेकर" म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि त्यांनी रणमैदानात बाजी मारली. विशेष म्हणजे जनतेच्या प्रश्नांची जाण ठेवत आलेल्या अडचणींना दूर करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले आणि आजही करत आहेत. जनतेला दिलेला प्रत्येक शब्द पूर्ण करण्यासाठी ते प्रत्येकाच्या हाकेला धावून जातात. एकदा जुळलेली नाळ ते कधीही तुटू देत नाहीत त्यामुळे त्यांचा सर्वदूर जनसंपर्क आहे ही त्यांच्या जमेची विशेष बाजू आहे असे म्हणावे लागेल. प्रत्यक्षात जाऊन काम करणे याचा अर्थ काय...? तर सामाजिक आणि राजकीय जीवनात काम करत असताना ज्या लोकांच्या पाठबळावर आपण राजकारण करतो त्यांच्या प्रत्येक अडचणीला धावून जाणे हा राजाभाऊ फड यांचा स्वभाव. स्वतःच्या आईला सरपंच करण्याचे आणि हेलिकॉप्टरने गावात घेऊन येण्याचे स्वप्न त्यांनी पूर्ण करून दाखवले. "जोपर्यंत आई सरपंच आहेत तोपर्यंत गावातील प्रत्येक मुलीच्या लग्नाला १० हजार रुपयांची मदत करणार" अशी प्रतिज्ञा त्यांनी केली आणि अखंडपणे ते आजही पाळत आहेत. मागील २५ वर्षांपासून ग्रामपंचायत त्यांच्या ताब्यात आहे. सरपंच म्हणून मतदारसंघातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या गावाचा त्यांनी कायापालट करून दाखवला. शासकीय योजना खेचून आणणे, त्यांची अंमलबजावणी करणे आणि विकासाची ही गंगा सर्वसामान्य लोकांच्या उंबऱ्यापर्यंत नेण्याचे काम राजाभाऊ यांनी केले आहे. हाच वासा आणि वारसा कायम अखंडपणे त्यांनी पुढे सुरू ठेवला आहे.



## राजकीय, सामाजिक क्षेत्रातील सर्वपरिचित हक्काचा माणूस

### उद्यमी कार्यकर्ता!

### संवेदनशील युवा नेता

### दूरदृष्टीचा माणूस

प्रस्थापितांच्या दबावाला बळी न पडता त्यांनी आजवर राजकारण केले. गुंडगिरी, दादागिरीला न जुमानता अनेक निवडणूका त्यांनी लढवल्या. कधी विजय वाट्याला आला तर कधी पराभव झाला. ऊन सावलीच्या या खेळाची गंमत त्यांनी पाहीलेली आहे. 2019 च्या गंगाखेड विधानसभा निवडणुकीत सासरे आ.रत्नाकर गुट्टे यांची संपूर्ण प्रचार यंत्रणा हाताळली. त्या निवडणूकीत त्यांनी श्री गुट्टे यांना निवडणूक आणले आणि किंगमेकर ठरले. राजेभाऊ फड यांनी कोद्री जिल्हा परिषदेची निवडणूक लढवली मात्र त्यात त्यांचा अल्प मतांनी निसटता पराभव झाला. परळी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अटीतटीच्या निवडणुकीत त्यांनी दणदणीत विजय मिळवला. ही निवडणूक संपूर्ण राज्यात गाजली होती. कृ.ऊ.बा.च्या निवडणूकीत तर त्यांच्या समोरील उमेदवार हे आताचे आमदार आहेत. म्हणजेच अत्यंत टोकाच्या लढाया लढून एखाद्या योद्ध्याप्रमाणे त्यांनी जिंकल्या आहे. झालेच तर कन्हेरवाडी ग्रामपंचायतचा मागील अनेक वर्षांपासून ते कारभार पाहत असल्याने त्यांना मोठा राजकीय अनुभव आहे.



व्यवसायाकडून राजकारणाकडे वळत असतांना त्यांनी काही गोष्टींचा विचार नक्कीच केलेला होता. ज्या क्षेत्रात आपण जात आहोत, त्या क्षेत्राचा लोककल्याणासाठी आणि जनसेवेसाठी वापर करायचा असाच ठामनिश्चय त्यांनी केलेला होता. आजवरच्या जीवनात त्यांनी अनेक राजकीय पक्षांमध्ये काम केले. पक्ष जरी बदलले असले तरी ते नेतृत्व, ते व्यक्तीमत्व आणि त्यांच्यातील कार्यकर्तृत्वाचे गुण मात्र जशास तसेच आहेत. भाऊंच्या कामाच्या कार्यकक्षा कुठल्याही एका वर्तुळापुरत्या मर्यादीत नाहीत. सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक, धार्मिक, शैक्षणीक अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांची भरीव कामगिरी आहे. वेळ, काळ आणि प्रसंग ओळखून धावून जाण्याची त्यांच्याकडे हातोटी आहे. एरव्ही तर ते त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला पूर्ण क्षमतेने मदत करतातच, मात्र सार्वजनिक संकटांच्या काळातही ते नेहमीच निरपेक्ष भावनेने समाजसेवेसाठी पुढे असतात. कोरोना महामारीच्या काळात त्यांनी शेकडो नव्हे तर हजारो जीवांना मदत केली. निराश्रीतांना आसरा, तहानलेल्यांना पाणी, भुकेल्यांना अन्न आणि गरजूंवर उपचाराची त्यांनी सोय केली. एकूणच त्यांनी चौफेर पध्दतीचे काम या काळात त्यांनी केले. असे नव्हे की फक्त गावातील आणि शहरातील गरजवंतांच्या मदतीला ते धावून जातात, तर मतदारसंघातील शहरी आणि ग्रामिण भागातील प्रत्येकाच्या मदतीला जाण्यास ते नेहमी तत्पर असतात. मदतीचा हात पुढे करीत असतांना त्यांनी नाव, गाव, जात, पात, पक्ष, शहरी, ग्रामिण असा कधीही भेदभाव केला नाही. आपल्याकडे आलेला माणूस हा आपलाच असे ते समजतात. ज्यांनी आपल्याला जीव लावला ती जीवाची माणसं असे समजण्याचा त्यांचा स्थायी स्वभाव आहे. आगामी विधानसभा निवडणूकीस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून त्यांना तिकीट मिळण्याची दाट शक्यता आहे. त्यांनी पक्षाकडे मुलाखतसुध्दा दिलेली आहे. पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार साहेब जे सांगतील तोच उमेदवार अंतिम असून, आपणही त्यांच्याच आदेशाचे पालन करणार असल्याचे ते म्हणतात. पक्षाने दिलेला उमेदवार म्हणजे तोच आमदार हे समजून ते या निवडणूकीत कामाला लागले आहेत...

- अक्षय मुंडे

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)